# सविस्तर जाहीरात

## अधिक्षक अभियंता, अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ,अमरावती

**सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / शाखा अभियंता (स्थापत्य) / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 स्थापत्य) यांच्या सेवाकरार पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन सामान्यप्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - 400032शासन निर्णय क्र. संकीर्ण 2715/ प्र.क्र. 100 /13/ दि.17.12.2016 नुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / शाखा अभियंता (स्थापत्य) / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 (स्थापत्य) यांना सेवा करार पध्दतीवर या मंडळांतर्गत (अमरावती व अकोला जिल्ह्यातील) कार्यालयांमध्ये सिंचन व बांधकाम या प्रकारच्या क्षेत्रिय कामांसाठी नेमणुक करावयाची आहे.

जलसंपदा विभागातीलसेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / शाखा अभियंता (स्थापत्य) / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 (स्थापत्य) यांची नेमणुक सेवा करार पध्दतीने 11महिण्यासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अभियंता यांचीसेवा अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती यांचे अधिनस्त विवक्षित क्षेत्रिय कामासाठी राहील. त्यांना सिंचन व बांधकाम या प्रकारचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदाराने विहीत नमुन्यातील अर्ज **कार्यकारी अभियंता,अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.1,अमरावती यांचेकडे दि. 22/07/2022 ला सकाळी 10 वाजे पासुन ते दि. 03/08/2022 (सायं.5 वाजेपर्यंत)** प्राप्त होईल, याप्रमाणे पोस्टाव्दरे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकीटावर **" सेवानिवृत्त कनिष्ठअभियंता (स्थापत्य) / शाखाअभियंता (स्थापत्य) / सहाय्यकअभियंताश्रेणी-2 (स्थापत्य) यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत "**असे स्पष्ट लिहुन ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव लिहीण्यात यावे. नियोजीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर सेवाकरार पध्दतीवर नेमणुकीचे आदेश हे सक्षम स्तरावर समितीच्या मान्यतेनंतरच निर्गमित करण्यात येतील. सेवा करार पध्दतीने भरावयाच्या पदाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | संवर्ग | एकुण जागा | नियुक्तीचे ठिकाण | विवक्षित कामाचा तपशिल(अमरावती व अकोला जिल्ह्यातील विभागिय कार्यालयांतर्गत) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 6 | अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती अंतर्गत | क्षेत्रिय स्तरावरील सिंचन व बांधकामाधीन प्रकल्पाची कामे, इत्यादी | शासन निर्णय क्र. संकीर्ण 2715/ प्र.क्र. 100 /13/ दि.17.12.2016 नुसार |
| पात्रता व अनुभव<br>बांधकाम कार्यप्रकारातील कामाचा अनुभव असलेले जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / शाखा अभियंता (स्थापत्य) / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 (स्थापत्य)यांनीच अर्ज करावा. | | | | | |

सदर नेमणुकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसे अर्जाचा नमुना महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या या http.//wrd.maharashtra.gov.inमुखपृष्ठावर उपलब्ध आहे.तसेच सदर नेमणुकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती बाबतची सविस्तर माहीती खालील कार्यालयामध्ये उपलब्ध असेल.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | दुरध्वनी क्र. |
|---|---|---|
| 1 | कार्यकारी अभियंता ,अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.1, अमरावती जलसंपदापरिसर, जेलरोड, अमरावती- 444603 | 0721-2666545 |

## विहीत नमुन्यातील अर्ज

जलसंपदा विभागांतर्गत अधिक्षक अभियंता,अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ,अमरावती येथे सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांची नेमणूक करण्यासाठीचा अर्ज

| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचीत्र |
|---|

प्रति,

अधिक्षक अभियंता,
**अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ,**
**अमरावती.**

अर्ज केलेल्या पदाचे नाव:–

| | | |
|---|---|---|
| 1 | अर्जदाराचे नाव | |
| 2 | कायमचापत्ता | |
| 3 | दुरध्वनी क्रमांक/भ्रमनध्वनीसह(अनिवार्य) | |
| 4 | ई-मेल (अनिवार्य) | |
| 5 | सध्याचा पत्ता | |
| 6 | जन्मतारीख | |
| 7 | राष्ट्रीयत्व | |
| 8 | प्रवर्ग | |
| 9 | लिंग(पुरुष/स्त्री) | |
| 10 | अवगत भाषा | |
| 11 | शैक्षणिक माहिती | |

| अ. क्र. | परिक्षा | वर्ष | विषय | शाळा/कॉलेजचे नाव | बोर्ड/विद्यापीठ | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |

12 इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादी)

| अ क्र | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रायोजक नाव | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

| | | हुद्या | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृतस्वरूपात) |
|---|---|---|---|---|---|
| 13 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)(संवर्ग)या पदावर काम केलेल्या पदाचा अनुभव | | | | |

| | | |
|---|---|---|
| 14 | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| 15 | सद्यास्थितीत कोठे काम करीता असल्याचा तपशिल | |
| 17 | प्रमाणपत्र | |

मला पुर्णपणे माहीती आहे की, पायाभुत सुविधा निर्मिती एम्प्लॉयमेंटव्दारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाकरीता उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद जाहीरातीत नमुद विवक्षीत कामासाठीच असुन जास्तीत जास्त 11 महीण्याच्या कालावधीसाठीच आहे.कामाच्या निकडीनुसार अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती अंतर्गत कोठेही काम करण्याची माझी तयारी आहे.तसेच जाहीरातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे.

मी सत्य प्रतीज्ञेवर कथन करतो की,माझ्या माहीतीप्रमाणे वर दिलेला तपशिल सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहीती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचना शिवाय रदद होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक:- अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

## अर्हता व अनुभव

| | |
|---|---|
| 1 | अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे. त्या पदाच्या विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केलेला त्या पदावर किमान तिन वर्षाचा जलसंपदा विभागातील कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| 2 | फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), शाखा अभियंता (स्थापत्य), सहाय्यक अभियंता श्रेणी-2, यांनीच सेवा करार भर्ती करीता अर्ज सादर करावा. |
| 3 | करार पद्धतीने नेमणुकी करण्यात येणारे सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता श्रेणी-2/शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता हे त्यांच्या वयाच्या 65 च्या वर्षापर्यतच कार्यरत राहू शकतील. तथापि ज्या सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता श्रेणी-2/शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता यांची सेवा त्यानंतर चालु ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या / प्राधिकाऱ्याच्या मान्यतेंने पुढे चालु ठेवता येतील, मात्र कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 70 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. |
| 4 | अर्ज करणाऱ्या अर्जदाराने त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक अधिकाऱ्याचे मुळ प्रमाणपत्र दयावे लागेल. |
| 5 | उमेदवाराविरुद्ध कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी/ न्यायालयीन प्रकरण / फौजदारी प्रकरणे चालु किंवा प्रस्तावी नसावी, किवा अश्या चौकशी प्रकरणी कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नसावी. याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन निवृत्त झाले आहे. त्या संबंधीत कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे. त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे. |
| 6 | अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटची 5 वर्षाच्या गोपनिय अहवालाची प्रतवारी संबंधित कार्यालयाकडुन प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.तसेच प्रशस्ती पत्र /नैपुन्य पुर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे. |

**सदर नेमणुका ह्या खालील सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधिन राहतील.**

| | |
|---|---|
| 1 | सेवा करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय नियुक्त सेवानिवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2715/ प्र.क्र.100/13 मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक मंत्रालय,मुंबई-4000032 दि.17.12.2016 मधील अटी व शर्ती लागु राहतील. तसेच शासन निर्णयासोबत असलेल्या परीशिष्ठ-अ नुसार मासिक परीश्रमीक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2715/ प्र.क्र.100/13 मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक मंत्रालय,मुंबई-4000032 दि.17.12.2016 नुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. |
| 2 | सदर नेमणुक 11 महिन्यासाठी राहील.11 महिन्यापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधितांचे कामकाज व आवश्यकता पाहुन नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेवु शकतात. मात्र एकुण कालावधी हा 3 वर्षापेक्षा अधिक असणार नाही. |
| 3 | करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही विभागात /संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावुन घेण्याबाबत वा नियमीत सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल. याबाबत निवड झालेल्या उमेदवाराने रू.100/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख दयावा लागेल. |
| 4 | करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेली कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र /हमीपत्र अटी व शर्ती संबंधित उमेदवाराला मान्य आहेत. याबाबत बंधपत्र निवड झालेल्या उमेदवारास रू.100/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे बंधणकारक राहील. |
| 5 | सदर अधिकारी/कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या पारपाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल.अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा. |
| 6 | अशा अधिकारी/कर्मचारी यांनी Conflict Of Interest जाहिर करणे आवश्यक राहील |
| 7 | क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवा काळामध्ये काही नैसर्गिक अपघात व आजार उदभवल्यास कार्यालय / शासन बांधिल राहणार नाही. |
| 8 | करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात वा समावेशनाव्दारे सामावुन घेण्याबाबतचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार /हक्क नसेल. |
| 9 | नियुक्ती प्रधिकारी यांना विशेष परीस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| 10 | अशा करार पध्दतीवरील अधिकारी/कर्मचारी यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहीती ,कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे बंधनकारक राहील. |
| 11 | नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चीत केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| 12 | ज्या कार्यालयात सेवाकराराद्वारे नियुक्ती मिळाली आहे त्या कार्यालयात शासनस्तरावरुन कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / शाखा अभियंता (स्थापत्य) / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 (स्थापत्य) याची नियुक्ती/ पदोन्नती/ बदलीने वा अन्य कोणत्याही माध्यमातुन अभियंते उपलब्ध झाल्याने व रिक्त पदे निरंक झाल्यास अथवा सदर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) / शाखा अभियंता (स्थापत्य) / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 (स्थापत्य) या संवर्गामध्ये पुरेसे मनुष्यबळ शासनाकडुन उपलब्ध झाल्यास नियुक्ती प्राधीकारी यांना कोणत्याही वेळी करार पद्धतीमधील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही. |
| 13 | सदर नियुक्ती अधिक्षक अभियंता,अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ,अमरावती येथे विवक्षीत कामासाठी करण्यात येत असुन त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास सेवा करार पध्दतीने भरावयाची पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार अबाधित राहील. |
| 14 | अर्ज करतेवेळी अर्जदाराने त्यांचे कुटुंब निवृत्ती वेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्ताऐवज सादर करणे आवश्यक आहे. |
| 15 | करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमीत झालेल्या दिनांकापासुन 15 दिवसाच्या आत नियुक्त होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल. |
| 16 | करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांस कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत. |
| 17 | उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरीक्त शासन /नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी ठरवतील. त्या अटी व शर्ती अंतिम राहतील. |
| 18 | कोणतेही कारण न देता अर्ज स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार अधिक्षक अभियंता, अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती यांना अबाधीत राहील. |
| 19 | मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्राद्वारे व ई-मेलव्दारे कळविण्यात येईल . अर्जदाराने आपल्या वैयक्तीक माहीतीत आपला ई-मेल पत्ता व भ्रमनध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवाराची यादी अधिक्षक अभियंता,अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ,अमरावती व कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.1, अमरावती येथील सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना पत्राद्वारे व वैयक्तीक इ-मेल वर कळविण्यात येईल. |

मुळ प्रत अ अ कडून मंजूर

सहा अधिक्षक अभियंता
अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
अमरावती